Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# महाराष्ट्रातील मातंग समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी : विश्लेषणात्मक अध्ययन

**यादव बाबुराव बोयेवार**, श्रीमती पी. बी. बागल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दोंडाईचा, जि. धुळे.
**प्रा. डॉ. विजय तुंटे**, मार्गदर्शक, प्रताप महाविद्यालय, अमळनेर जि.जळगाव

**प्रस्तावना :**

भारतीय समाज हा विविध जाती धर्माने निर्माण झालेला समाज आहे. प्राचीन काळापासून भारतीय समाजात वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था अस्तित्वात असल्याचे दिसून येते. वैदिक काळापासून ते आजच्या कलयुगात सुद्धा भारतीय समाज व्यवस्था ही क्रमवार वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेवर आधारित आहे. आजच्या घडीला बहुतांशी प्रमाणात वर्णव्यवस्था ही नामशेष झाल्याचे दिसून येते. परंतु जातिव्यवस्था ही दिवसेंदिवस समाज व्यवस्थेला चिकटून राहताना व दृढ होताना दिसून येते. भारतीय समाजात जवळजवळ आठ हजार जाती अस्तित्वात आहेत. परंतु डॉ. श्री. व्य. केतकर यांच्या मते, भारतीय समाज व्यवस्थेत जातीची एकूण संख्या ४००० एवढी आहे. भारतीय समाज व्यवस्थेत जातीच्या निर्मितीच्या संदर्भात सूक्ष्म अभ्यास केला असता असे दिसून येते की, या समाज व्यवस्थेत जातीची निर्मिती केव्हा झाली हे मात्र निश्चित सांगता येत नाही. भारतीय समाज व्यवस्थेत जातीची ही समाज संरचना श्रेष्ठ व कनिष्ठ अशा उतरत्या श्रेणीमध्ये विभाजित झालेली आहे. वरिष्ठ जातींना सवर्ण, मध्यम जातींना मागास तर कनिष्ठ जातींना अस्पृश्य ठरविल्याने प्रत्येक जातीचा दर्जा निश्चित केला गेला आहे. रोटी-बेटी व्यवहा□□□□ व सामाजिक वर्तन या बाबीवर मर्यादा घातल्याने प्रत्येक जात मर्यादित जीवन जगताना दिसून येते.

अशा रीतीने महाराष्ट्रात मांग ही जात अस्पृश्य समाजातील अतिशय खालच्या दर्जाची समजली जाते. ही जात प्राचीन काळापासून आजतागायत वरिष्ठ जा□□□□ सेवा करत आलेली आहे. पूर्वी मांग म्हणून संबोध□□□□ □□□□□□□□□ या जातीस आज मातंग म्हणून संबोधले जाते. त्यामुळे मातंग समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिती समजून घेण्यासाठी मातंग समाजाची ऐतिहासिक स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सदर शोधनिबंधात महाराष्ट्रातील मातंग समाजाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन करण्यात आले□□ आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

□) मातंग समाजाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.

□ ) मातंग शब्दाचा अर्थ व उत्पत्तीचे अध्ययन करणे.

**शोधनिबंधाची गृहितके :**

१) जातीव्यवस्थेत अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या समाजातील मातंग ही एक जात आहे.

□) मातंग समाजाला थोर ऋषीमुनी, शूर लढवय्या, गौरवशाली व पराक्रमी राजाचा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.

**शोधनिबंधाची संशोधन समस्या :**

भारतीय समाज व्यवस्थेतील मातंग समाज हा अनुसूचित जाती प्रवर्गातील एक जात गट असून त्यांचा पारंपारिक दर्जा अत्यंत निम्न पातळीवरील आहे. भारतीय समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नांना इतर


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

जातींनी जसा सकारात्मक प्रतिसाद देऊन विकासाचा मार्ग निवडला. त्यातून त्या समाजाची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थान उंचावण्यास मदत झाली. त्या तुलनेत मात्र मातंग समाजाने पारंपारिक हिंदूधर्मीय प्रथा परंपरेमध्येच स्वतःला गुंतवून घेतल्यामुळे त्याच्या विकासाला एक प्रकारची मर्यादा राहिली आहे. शिक्षणाचा अभाव, पारंपारिक व्यावसायिकता, राजकीय संघटन व स्वतंत्र आरक्षणाचा अभाव अशा अनेक कारणामुळे या समाजाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आजच्या एकविसाव्या शतकात हा समाज अनेक समस्यांनी ग्रस्त असल्याचे दिसून येते.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. याकरिता वर्तमानपत्रे, ग्रंथ, मासिके आणि ऑनलाइन वेबसाईट /लिंक इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा सामाजिक शास्त्रातील राज्यशास्त्र या विषयातील असून समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीतील ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग सदर शोध निबंधात करण्यात आला आहे.

**मातंग जात :**

अनुसूचित जातीची (Shedual Castes) अधिकृत यादी पहिल्याप्रथम १९३० मध्ये प्रसिद्ध करण्यात आली व १९५७ मध्ये त्यात सुधारणा करून पुन: प्रकाशीत करण्यात आली. त्यात जवळजवळ अकराशे (११००) जातीचा अंतर्भाव होता. इ.स. १९६१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात अनुसूचित जातीत एकूण ५९ जातीचा समावेश होतो. त्यापैकी महार जात अनुसूचित जातीच्या ३५.१२ %, मातंग जात ३२.६५ % तर चांभार ही जात २२.६६ % होती. या प्रमुख जाती मिळून अनुसूचित जातीच्या एकूण टक्केवारीत ८९.९६ % आहेत तर बाकीच्या इतर ५६ जाती मिळून एकूण अनुसूचित जातीच्या टक्केवारीत १०.०४ % आहेत. संबंधित आकडेवारी पाहता अनुसूचित जातीतील लोकसंखेनुसार मातंग या जातीचा दुसरा क्रमांक लागतो असे म्हणता येईल.

**मातंग शब्दाची उत्पत्ती :**

मातंग या शब्दाची उत्पत्ती भाषाशास्त्राच्या आधारे शस्त्राशिवाय महाआतंक माजविणारा असा होतो. जसे म + आतं□ = मातंग ( □ = मोठा, महा., आतंग = पराक्रम, दरारा ) अशाही अर्थाने मातंग शब्दाची उत्पत्ती अभिप्रेत आहे. मातंग लोक शत्रूवर शस्त्राशिवाय चढाई करण्यात निपुण होते. जसे मात + □□□ = मातंग म्हणजे मा□ = चढाई, अंग = शरीर. अर्थात सर्व शक्ती असलेला असा होय. मूळचा शब्द मॉंग, मांग, मंग हा आहे. किष्किंधा म्हणून तुंगभद्रेच्या काठावर जो प्राचीन देश होता तेथे मंग, मॉंग लोकांची वस्ती असून त्यांचे स्वतंत्र राज्य होते. त्यांची रामायणात वानरामध्ये गण□□ केलेली केली आहे. मंग म्हणजे वानर असा कानडी शब्द आहे. मंग हा शब्द तेलगू आणि कानडी भाषेतही आहे. तो इंग्रजी भाषेत (Monkey) वानर या अर्थाने प्रसिद्ध आहे. त्या जातीचे दक्षिणेस कानडी व तेलगू देशात, मध्य महाराष्ट्रात मांग आणि उत्तरेकडे सुरतेच्या आसपास मांगेल असे तीन प्रकार आढळतात.

डॉ. इरावती कर्वे यांनी, “मातंग म्हणजे गावच्या शेवटी राहणारे व शूद्रातील खालचे लोक असे वर्णन केलेले आहे”. नाना कटाळे या अभ्यास□□ने मांग या शब्दाऐवजी मातंग असा शब्द वापरला असून


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

त्याचा अर्थ म्हणजे “अंगात सर्व शक्ती असलेला पराक्रमी असा” अर्थ दिलेला आहे. याच प्रकारचा अर्थ डॉ. बाबासाहेब गो□ले यांनी चळवळ चालवत असताना मेळावे, उपोषण व शासकीय निवेदनात मांग शब्द ऐवजी मातंग हा शब्द वापर□□ला असून त्यांच्या सामाजिक चळवळीच्या रेट्यामुळे शासकीय जनगणना अध्ययनात सुद्धा मांग जातीला मातंग असे नाव मिळालेले आहे. गोडे, कर्वे तसेच आपटे यांच्या शब्दकोशात ‘मातंग म्हणजे खालच्या जातीचा मनुष्य, चांडाळ, किरात असा अर्थ दिला आहे.

थोडक्यात मातंग व मांग हे शब्द सारख्याच अर्थाने वापरले जातात. या दोन्ही म्हणजे मांग व मातंग शब्दावरून मातंग ऋषीचे पुत्र, अंत्यवासी, गावाबाहेर राहणारे, खालच्या शूद्र जातीतील लोक हे अर्थ त्यास येतात. परंतु नेमका निश्चित अर्थ सांगणे मात्र कठीण आहे. एवढे मात्र खरे की, वर दिलेले विभिन्न अर्थ मातंग या जाती गटाचे वैशिष्ट्ये निदर्शनास आणून देतात.

**मातंग जातीचा इतिहास (ओळख):**

मातंग समाजाला फार मोठी ऋषीमुनीची आणि शूर लढवय्या राजाची ऐतिहासिक परंपरा असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे मातंग लोक स्वतःला उच्चवर्णीय किंवा पराक्रमी समजतात. विशेषत: या समाजाचा मूळ पुरुष म्हणून मार्तंड ऋषी असल्याचे सांगतात. याशिवाय मातंग समाजाचा वैभवी पराक्रमाचा पुरावा म्हणून रामायणाचा दाखला दिला जातो. एकूणच हा समाज महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्रप्रदेश, गुजरात व कर्नाटक तसेच आसाम मध्ये सुद्धा विखुरलेला दिसून येतो. महाराष्ट्रात या जातीला मांग किंवा मातंग म्हणतात. म्हैसूर प्रदेशात याचा निर्देश मादिग असा करतात. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात मादिक किंवा मादीगा असे म्हणतात. गुजरात आणि मध्य प्रदेशाच्या सीमावरती भागात मांगेला या नावाने ओळखले जाते. तसेच आसाममध्ये मांग या जातीला माला या नावाने ओळखले जाते.

**मातंग जातीचे वर्णव्यवस्थेतील स्थान :**

भारतीय हिंदू समाज व्यवस्थेत चार प्रकारचे वर्ण अस्तित्वात होते. त्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र, त्यावर आधारित समाज व्यवस्थेला चातुरवर्णीय समाज व्यवस्था म्हणतात. वर्ण हा शब्द जातीवाचक नसून तो गुणक्रम यावरून ठरतो. गुण आणि कर्म यांच्या विभाजनाच्या अनुरोधाने चार वर्ण निर्माण झालेले आहेत. सर्व लोक एकच आहेत. परंतु स्वभावत: गुणक्रमामुळे चार वर्णात विभागणी झालेली आहे. वर्णव्यवस्था ही प्रकृतीजन्य युगातील भेदाप्रमाणे त्यांना कर्मे वाटली गेली असे सांगून भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात की, तत्त्वत: विचार केला तर या वर्णभेद संस्थेचा कर्ता मी नव्हे. ब्राह्मणवादी चार वर्णातील माणसे वस्तूत: एकच आहेत. परंतु त्यांच्या ठिकाणी जे स्वभाव धर्म व प्रकृतीजन्य गुण आहेत, त्यांच्या अनुरोधाने त्याची चार वर्गात विभागणी झाली आहे. यावरून असे म्हणता येईल की, वर्ण हे गुण आणि कर्मावरून ठरले हे स्पष्ट होते.

अशा रीतीने वर्ण व्यवस्थेतून जातीसंस्था निर्माण झाल्या. कालांतराने जातीव्यवस्था ही ताठर बनत गेली. त्यामध्ये मातंग जात शूद्र वर्णातील अतिशूद्र या वर्णात मोडणारी जात आहे. याव्यतिरिक्त मातंग समाजाचे स्थान हे खालच्या जातीचे आहे. हिंदू धर्म संस्कृतीत मातंग जातीला ज्याप्रमाणे एकीकडे खालच्या दर्जाचे स्थान आहे, त्याचप्रमाणे दुसरीकडे अत्यंत महत्त्वाचे स्थान सुद्धा देण्यात आले आहे. हे सामाजिक संकेतावरून दिसत असले तरी तर्कसंगत वाटत नाही. काही सामाजिक चालीरीती मातंगाशिवाय पूर्णच होऊ शकत नाहीत असा सामाजिक संकेत आहे. अस्पृश्यता ही हिंदू धर्मातील एक वाईट व अमानुष प्रथा आहे. तरी परंतु मातंग समाजास हिंदू चालीरितीपरंपरेत मानाचे स्थान आहे. थोडक्यात एखाद्या मंगल


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

कार्यासाठी घराबाहेर पडले असता वाटेत मातंग किंवा पाण्याने भरलेली घागर घेऊन जाणारी मांगीन आडवी आली तर शुभ शगुन मानतात. कोणत्याही चांगल्या कामाची सुरुवात लोक मातंगाचे हस्ते करतात. त्यामुळे हमखास यश प्राप्ती होते असे ते मानतात. पेरणीच्या वेळी शेतकरी मांगणीची ओटी भरतात. सुगीच्या दिवसात किंवा पेरणीच्या वेळी मातंगानी शेतीवर जाऊन देवदेवतांच्या व शेतीमालकाच्या स्तुतीपर कवणे म्हणण्याची प्रथा होती. त्यामुळे शेतात भरपूर धनधान्य पिकते अशी लोकांची समजूत होती. ब्राह्मण जातीत मुंजेच्या वेळी मुलाच्या कमरेला बांधावयाचा दर्भ मातंगानीच दिलेला असावा असा सामाजिक संकेत आहे.

अशा रीतीने हिंदूंच्या सणवार प्रथेत मातंगाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण बैलपोळयाच्या सणाला पाटील, देशमुख, देशपांडे यांच्या घराला व गावच्या वेशीवर तोरण बांधण्याचा मान मातंगाचाच असतो. मातंगाच्या हस्ते या सणास तोरण बांधणे शुभ समजतात. हे तोरण मातंग लोक आंब्याची पाने व मोळाची दोरी यापासून बनवतात. बैलपोळयाला मातंग लोकास सवर्ण लोक जेवू घालतात. ही प्रथा महाराष्ट्रात सार्वत्रिक आहे. दसऱ्याच्या सणाला मातंग लोक तांबडी माती आणि तरवड्याच्या डहाळीची पेंडी प्रत्येक सवर्णांच्या घराच्या दारात ठेवतात. त्या मोबदल्यात मातंगांना सवर्ण लोक धान्य व सणाचे अन्न वाढून दिले जाते. तसेच दसऱ्याला मातंगाच्या हातून लोक पत्रावळ भरतात. त्यामुळे इडा-पिडा टळते अशी लोकांची भावना आहे. एवढेच नाही तर मातंग समाजाला 'भेटेल मांग तर फिटल पांग' असे□□ म्हटले जाते. मातंगाने वरिष्ठ वर्गाचे पांग फिटले असेलही परंतु मातंग समाजाच्या विकासाचे पांग फिटलेले नाही. त्यांच्या विकासाचा रस्ता प्रशस्त झालेला नाही, हे सत्य कोणालाही नाकारता येत नाही.

**मातंग जातीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

मातंग समाजाची कथा, रामायण, महाभारतात असली तरी मातंग जाती असा उल्लेख या ग्रंथामध्ये प्राप्त होत नाही. म्हणून स्मृती व इतर स्मृतीत चांडाळ, पुलक्स, निषाद यांची नावे सापडतात. परंतु आजच्या समाज स्थितीतील महार, मांग, ढोर, धेड वगैरे अनेक जातीची नावे त्यात आढळत नाहीत. एकूणच मातंग जातीच्या स्थानासंबंधी काही ऐतिहासिक पुरावे देखील सापडलेले आहेत. त्या दृष्टीने ऐतिहासिक पुराव्याचे अध्ययन पुढील प्रमाणे करता येईल.

**लिळा चरित्रात प्रथम उल्लेख :**

मांग जातीचा सर्वप्रथम उल्लेख लिळा चरित्रात आढळून येतो. प्रस्तुत ग्रंथ इ.स. १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिलेला असून तो ज्ञानेश्वरीपूर्व आहे. असे डॉ. वि. भि. कोलते यांनी म्हटले आहे. या ग्रंथात मांग या जातीतील व्यक्ती मंदिराच्या बाहेर राहून कळसाला जोहार करतात. मांग लोक उपद्रव करतात यासारखे उल्लेख येतात. गोविंद प्रभू चरित्रात, मातंग जात अस्पृश्य असून गावाबाहेर राहणारी आहे असे म्हटले आहे. यादवकालीन महाराष्ट्रात )इ.स. १००० ते इ.स. १३३० ( सुद्धा मातंग जातीचे घरे गाव कुसाबाहेर असत, इतर जाती जमातीची घरे गावकुसाच्या आत असत असा उल्लेख श्री मु. ग. पानसे यांनी केला आहे. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या गाथेतील अभंगात प्रतिमान त्यातून मांग म्हणून मांग जातीचा निर्देश चार वेळा आलेला आहे. म्हणजे दुष्ट कामे करणारा अशी चित्र समोर येते. इतकेच नाही तर बलुतेदारी व्यवस्थेतील एक घटक जात या दृष्टीनेही वर्णन केले आहे असे लक्षात येते.

**मातंग जातीचा मूळ पुरुष:**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

मातंग जातीच्या मूळ पुरुषाबाबत अनेक प्रकारचे मतभेद दिसून येतात. जसे मातंग जातीची उत्पत्ती कशी झाली असावी हा ही मुद्दा वादाचा झालेला असून मातंग जातीच्या मूळ पुरुषाबाबत वेगवेगळ्या विचारवंतांनी केलेल्या अभ्यासातून व जातीपुराणातून भिन्न असे निष्कर्ष समोर आलेले आहेत. याचा अभ्यास खालील प्रमाणे करता येईल.

**जांभ ऋषी -मातंगाचा मूळ पुरुष :**

मातंग लोकांची अशी समजूत आहे की, ते जांभऋषीचे वंशज आहेत. जांभऋषी हा जगात निर्माण झालेला आद्यमानव असल्याचे जाती पुराणात वर्णन येते. आद्यमानव डक्कलवाराच्या जाती पुराणांमध्ये जांभऋषीचे एक स्वतंत्र व्याख्यान असते. ते सांगतात की, प्रथम अंधकार होता मग धुंदकार झाला. त्या ठिकाणी लोहाचा अवतार झाला या लोहापासूनच निराकारातून आकार निर्माण झाला. त्याच्या उजव्या बाजूचा घाम काढून पाण्यात टाकल्यावर शंखात जांभऋषी उत्पन्न झाला. जांभऋषीच्या मांडीतून रक्तमुनी, दिपमुनी, हिपमुनी, पालमुनी, महामुनी किंवा कर्कमुनी असे निर्माण झाले. त्यातूनच पुढे मानव सृष्टी निर्माण झाली. एकूणच मातंग जात जांभऋषीला आपला मूळ पुरुष मानते.

**मातंग चांडाळाचे वंशज :**

मातंग चांडळाचे वंशज असल्याचेही सांगितले जाते. पाली साहित्यातील सुनिपात या ग्रंथात मातंग आणि चांडाळा हे शब्द एकमेकास पर्याय म्हणून वापरलेले आहेत. यावरून चांडाळ म्हणजे मातंग होय. श्री वि. रा. शिंदे हे मांगाच्या उत्पती विषयी असे म्हणतात की, मातंग लोक हे मूळचे कोल )कोळी( वंशाचे असावेत. यावरून आपणास असे म्हणता येईल की, मातंग जातीच्या मूळ पुरुषाबाबत मतभिन्नता दिसून येते.

**मातंग जातीची उत्पत्ती कथा :**

डॉ.भा. की. खडसे यांच्या सामाजिक परिवर्तना संदर्भात मातंग जातीचा अभ्यास रसेल आणि हिरालाल यांनी 'डिस्ट्रिक्ट गॅझिटीयर' मधुन मातंग जाती विषयी माहिती नोंदविताना मातंग जातीच्या उत्पत्ती कथा दिलेल्या आहेत. प्रा. बी.सी. सोमवंशी यांच्या "भारतीय जातीसंस्थेत मातंगाचे स्थान" या पुस्तकातील कथांचे येथे उल्लेख केलेला आहे.

१) श्रम ऋषीचा मुलगा कर्कमुनी याला दोन पुत्र होती. त्यापैकी एकाने गाय मारून खाल्ली तेव्हा शंकराने संतापून त्याला तू महार होशील असा शाप दिला व दुसऱ्या मुलाच्या अंगावर त्या गाईच्या रक्ताचे शिंतोडे पडलेले होते ते पाहून तू मांग होशील असा शाप दिला. अशी मातंगाच्या उत्पत्तीची कथा सांगितली जाते.

२) अवंतीनगरीत सात भावांचे राज्य होते. सर्व मातंग होते. आर्य भारतात आले तेंव्हा त्यांचे आर्याशी युद्ध झाले. त्यात ते हरले परंतु आर्यांना शरण गेले नाहीत. त्यांनी आपले जीवन रानावनात हलविले आणि उदरनिर्वाहासाठी झाडू, दोरखंड, गोफण, बांबूची कामे केली. तेंव्हापासून आम्ही मांग गावाच्या बाहेर राहून बांबूची कामे करू लागलो पण कोणालाही शरण गेलो नाही असे म्हटले जाते.

३) ब्रह्मदेव सृष्टी निर्माण करीत असताना त्या कार्यात त्यांना आकाश अश्व खूप त्रास देत असत. त्यांच्यापासून होणारा त्रास दूर करण्याकरिता ब्रह्मदेव देवांनी पहिल्या प्रथम मातंगाला निर्माण केले आणि त्याने आकाश अश्वाचा बंदोबस्त केला. अशा प्रकारे सृष्टीच्या उत्पतीत मातंगाचे योगदान आहे व त्याचा निर्माता ब्रह्मदेव आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

४) फार वर्षांपूर्वी नांगरासाठी गुरांचा उपयोग केला जात नव्हता. तेंव्हा पृथ्वीवर भयंकर दुष्काळ पडला. पेरणीसाठी बी सुद्धा शिल्लक राहिले नाही. त्यावेळी भगवान महादेववाला दया आली आणि पेरणीसाठी त्यांनी धान्य दिले. कुणबी स्वतः नांगर ओढू लागला परंतु पोटातील भुकेमुळे त्याला ते अशक्य प्राय झाले. त्याने महादेवाची प्रार्थना केली. देव प्रसन्न झाले व त्यांनी कुणब्याच्या मदतीसाठी नंदी दिला. महादेव उपस्थित असेपर्यंत नंदिनी चांगले काम केले. परंतु महादेव अंतर्धीन पावताच नंदिनी काम करण्याचे नाकारले. कुणब्याने पुन्हा महादेवाची प्रार्थना केली. महादेव प्रकट झाले. नंदिनी अवज्ञा केली म्हणून ते संतापले व त्यांच्या कपाळावरून घामाचा एक थेंब खाली पडला त्यातून जन्मास आलेल्या माणसाला नंदीला वटणीस आणण्याचे कार्य महादेवाने सांगितल्यापासून त्या माणसाने नंदीला खच्ची केली. तेंव्हापासून नंदी चांगले काम करू लागले. परंतु खच्चीकरणात नंदीला जे दुःख झाले त्यामुळे संतापून जाऊन "तू आणि तुझ्या वंशातील कोणीही बैलाच्या साह्याने शेती करू शकणार नाही" असा शाप नंदिनी दिला. म्हणून मातंगाच्या पूर्वजांना मिळालेल्या शापामुळे त्यांना शेतीत केव्हाच यश मिळणार नाही असे म्हंटले जाते. यावरून 'केली शेती आणि झाली माती' ही मन देखील मातंगास प्रचलित आहे.

वरील प्रकारच्या सर्व उत्पत्ती कथा बृहत परंपरेतील नाहीत, अशा प्रकारचे उल्लेख धार्मिक ग्रंथात प्राप्त होत नाहीत. त्याचे स्वरूप इतर जातीच्या कथासागरासारखे आहे. कथांमध्ये महादेव, ब्रह्मदेव, नाराद असे जरी असले तरी वरील कथामधून मातंग जातीची वैशिष्ट्ये व या जातीचा अर्थ समजण्यास बरीच मदत होते.

**मातंग समाजातील ठळक प्रकार :**

मातंग जातीमध्ये वेगवेगळया प्रकारचे भेद किंवा जातीचे प्रकार दिसून येतात ते खालील प्रमाणे सांगता येते.

१( प्रदेशाच्या आधारे - महाराष्ट्र मातंग, गुजराती मातंग, दखनी मातंग, मध्यप्रदेशी मातंग.
२( महाराष्ट्रातील विभागाप्रमाणे - वऱ्हाडी मातंग, खानदेशी मातंग, दख्खनी मातंग, घाटोळे मातंग.
३( धर्मपंथ व जातीचे आधारे - मुसलमान मातंग, ख्रिस्ती मातंग, महानुभव मातंग, मराठा मातंग, बौद्ध मातंग.
४( शुद्ध-अशुद्धतेच्या कल्पनेनुसार - अस्सल मातंग, अक्करमासे मातंग.
५( व्यवसायाचा आधार - वाजंत्री मातंग, अक्करमासे मातंग, टोकरफोडे मातंग, मोची मातंग, म्हेशभादरे मातंग तसेच मांग गारोडी, भरारी, राधे मातंग, मादिगा, जिराईत, ढोर, घडशी, देसून, होलार, कक्कर, काटे इत्यादी मातंगाचे प्रकार असलेले दिसून येतात.

वरील प्रकारचे जरी मातंगाचे पूर्वी प्रकार सांगितले जात असले तरी आज या जातीतील असंख्य भेद जवळजवळ संपुष्टात आलेले दिसून येतात परंतु काही भेद मात्र आजही तीव्र स्वरूपात पहावयास मिळतात.

**सारांश व निष्कर्ष :**

हिंदू चालीरीती व परंपरा यात मातंगाला जे महत्त्व स्थान प्राप्त झालेले आहे ते डॉ. प्रभाकर मांडे यांना मान्य नाही. त्यांच्या मते, मातंगास गाव गाड्यात जे काही मानपान आहे हे जरी खरे असले तरी मातंग लोक गावगाड्या□ सामील होऊ शकले नाहीत. त्यांची पाळेमुळे गावगाड्यात रुजू शकले नाहीत. मातंगाचे


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

गावगाड्या बाहेरील भूमिगत जीवन क्वचित अजूनही चालूच आहे. म्हणूनच त्यांची परंपरेने चालत आलेली गुप्त आणि सांकेतिक भाषा देखील क्षीणपणे का होईना प्रचलित आहे. त्याला ते पारशी असे म्हणतात.

वरील सर्व सादरीकरणावरून हिंदू वर्णव्यवस्थेच्या परंपरेतील व चालीरीतीतील जातीव्यवस्थेत मातंगाला जे स्थान प्राप्त झाले आहे त्याचा थोडक्यात निष्कर्ष काढावयाचा झाल्यास स्पर्शवर्गांनी अस्पृश्यांना जे हक्क व जे मानपान बहाल केले आहेत, त्याचा अस्पृश्यपेक्षा स्पर्श वर्गाचाच दोन पद्धतीने फायदा झालेला आहे. त्यातील पहिला फायदा म्हणजे या हक्क व मानपानामुळे आपली ही जात इतर जातीपेक्षा कमी महत्त्वाची नाही ही भावना अस्पृश्य वर्गात निर्माण झाली. परिणामी या अस्पृश्य जाती आपल्या जातीत चिकटून राहण्यास मदत झाली. या मतास ऱ्हेनियस सारख्या अभ्यासकांचा आधार मिळतो. याचा दुसरा फायदा म्हणजे अत्यंत तुटपुंज्या ) भाकरीचे शिळे तुकडे व ताकाचे पाणी ( मोबदल्यात अत्यंत घाणेरडी, निकृष्ट व अवमानकारक कामे करण्यास अस्पृश्यवर्ग उपलब्ध झाला. परंतु आज कायद्याने अस्पृश्यता नष्ट करण्यात आली असून अस्पृश्यता मानणे हा गुन्हा मानला जातो. अर्थात हे जरी खरे असले तरी कायद्याने समाज बदलता येतो का ? हा खरा प्रश्न आहे. अस्पृश्यता निवारणाचा कायदा झाला खरा पण अस्पृश्यता गेली काय ? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल. कारण तिचे मूळ आजही तसेच आहे. असे होण्याचे मुख्य कारण म्हणजे ज्या गतीने आपल्याकडे विज्ञानाची प्रगती झाली त्या गतीने समाजाची प्रगती झाली नाही. म्हणून आज खरी गरज आहे समाज प्रगतीला चालना देण्याची असे मनोमन वाटते.

अनेक वर्षापासून गावाच्या सेवेला हजर असणारा, प्रसंगी जीव धोक्यात घालून गावाच्या समृद्धीसाठी परगावाच्या होळीचा विस्तव आणून गावाच्या होळीत टाकणारा, सवर्णांच्या विहिरीला पाणी लागावे नि त्यांची गडी उभी राहावी म्हणून आत्मबलिदान करणारा, दररोज मारुती तथा हनुमान आणि मरीआईचा शहाडा वाजविणारा मांग आजही पूर्वी होता तसाच दिसून येतो. राजकीय चळवळ नसणाऱ्या या नेतृत्वहीन समाजाला ना सवर्ण ना दलीत कोणत्याही प्रसंगाला जवळ करीत नाहीत. समाजसुधारकांच्या कार्याला प्रतिसाद देऊन दलित समाजातील इतर जातीने ज्या पद्धतीने आपला सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय विकास घडवून घेण्याचा प्रयत्न केला तसा प्रयत्न मातंग समाजात झाल्याचे दिसून येत नाही. याच्या कारणांचा जेव्हा मागवा घेण्याचा आपण प्रयत्न करतो, त्यामध्ये आपणास असे म्हणावे लागते की, मातंग समाजात शिक्षणाचा अभाव मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे शिक्षणाचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर मातंग जातीतील सुधारणा विषयक जे काही घडले ते प्रामुख्याने शहरातून घडले. बहुसंख्य मातंग समजा खेड्यातच वास्तव्य करतो. त्यामुळे शिक्षणाच्या लाभाचे प्रमाण अनुसूचित जात समूहाच्या तुलनेत अत्यल्प राहिले. ध्येयवादी व प्रखर सामाजिक जाणीव निर्माण करणारी कार्यकर्ते या समाजाला अद्यापही मिळालेले नाहीत. पारंपारिक बलुतेदारीतून हा समाज बरेच वर्ष बाहेर पडू शकला नाही. परिणामी बहुसंख्य मातंग समाज सुधारकांच्या या सुधारणात्मक प्रयत्न पासून वंचित राहिल्याचे आपणास दिसून येते.

थोडक्यात महाराष्ट्रातील मातंग जात ही अजूनही उद्धाराच्या शोधात आहे. त्यांची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थिती हलाखीची आहे. राजकारण व प्रशासन यामधील त्यांचा सहभाग नगण्यच आहे. कमालीचे दारिद्र्य असलेल्या समाजात त्यांच्यात जागृती व प्रखर स्वाभिमान निर्माण होण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

१. विजय साहेबराव तुंटे - महाराष्ट्रातील दलितांचे राजकारण : मातंग जातीचा विशेष अभ्यास, पी.एचडी.
२. शोध प्रबंध. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास सादर, डिसेंबर-२००९.
३. प्रभाकर मांडे - मांग आणि त्यांचे मागते, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद. ऑक्टोबर १९९९.
४. आर. के. त्रिभुवन -दे दान सुटे गिऱ्हान, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. १९९३.
५. बी.सी. सोमवंशी - भारतीय जातीसंस्थेत मातंगाचे स्थान आणि महार-मांग संबंध, आनंद प्रकाशन, जयसिंगपूरा, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती १५ ऑगस्ट १९८९.
६. रामनाथ चव्हाण - जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. एप्रिल १९८९.
७. दिलीप अर्जुने - मातंग समाज स्थिती आणि गती, प्राचार्य डॉ. रामलाल अग्रवाल पुस्तक समिती, जालना.जून २००६.
८. दा. धो.काचोळे - मांग ऐतिहासिक प्रवास, (संपादक-बी.सी. सोमवंशी -महाराष्ट्रातील मांग), आनंद प्रकाशन,जयसिंगपूरा, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती १४ एप्रिल २००६.

 Copyright © | JET Network, All Rights Reserved